**नि.फौ.ख.क्र. ३८७ / २०२३**

**निशाणी क्र. ४४**

**<u>साक्षीदार क्र. ५ चा शपथेवर जबाब</u>**

मी याव्दारे प्रतिज्ञापुर्वक निवेदन करतो की,

माझे नाव – विनोद नेमिचंद सुराणा

वय सुमारे – ५६ वर्षे, उपजिवीका – व्यवसाय

राहणार – श्रीरामपूर, ता.श्रीरामपूर.

**<u>सरतपास अभियोग पक्षातर्फे सहाय्यक सरकारी अभियोक्ता श्री. पी. आर. धुमाळ यांचे मार्फत.</u>**

**१.** माझे कपडयाचे दुकान आहे. सन २०२२ साली माझे कपडयाचे दुकान नेवासा रोड वर होते. त्या दुकानाचे नाव ' द रेमंड शॉप' असे होते. माझ्या दुकानात महेंद्र पटारे व दिपक पटारे नेहमी येत असतात. दिनांक ०९.१०.२०२२ रोजी महेंद्र पटारे व दिपक पटारे माझ्या दुकानात आले असतील पण मला निश्चीत तारीख व वार सांगता येणार नाही. महेंद्र पटारे व दिपक पटारे माझ्या दुकानात आल्यावर खरेदी करत असतात. त्यांनी मला कुठे जायचे आहे याबाबत सांगितले नव्हते.

**<u>टीप- साक्षीदार सरकार पक्षाच्या कथनाला समर्थन करत नसल्यामुळे सरकारी वकीलांनी साक्षीदाराची उलट तपास करण्याची परवानगी मागितली. सरकारी पक्षाला उलटतपासात विचारण्यात येणारे प्रश्न तसेच फौजदारी दंड प्रक्रीया कलम १६२ अंतर्गत प्रश्न विचारण्याची परवानगी देणेत येत आहे.</u>**

**०२.** हे मला सांगता येणार नाही की दिनांक ०९.१०.२०२२ रोजी दुपारी २.०० वाजता महेंद्र व दिपक पटारे यांच्या सोबत दत्ता जाधव हे तेथे आले असतील. हे माझ्या लक्षात नाही की दिपक पटारे मला म्हटले की, 'माझ्या भाचीचे लग्न आहे व त्यांना जॅकेट व कापड घ्यायचे आहे'. हे मला आठवत नाही की मी त्यांना कापड दाखविले व त्यांनी मला पैसे दिले व त्यानंतर मी त्यांना जॅकेट दाखविले.

**प्रश्न –** एक दोन जॅकेट त्यांना दाखविले पण त्यांना पसंत पडले नाही त्यांच्या मापाचे नसल्याने त्यांनी जॅकेट घेतले नाही ?

**उत्तर –** सेल्समन दाखवत असतात, मी दाखवत नाही.

**०३.** हे म्हणणे खरे नाही की त्यानंतर मी त्यांना चहा मागविला व त्यानंतर बिलाची पावती तयार झाल्यानंतर त्यांनी पेमेंट केले व ते निघुन गेले.

**उलटतपास आरोपीं तर्फे विधीज्ञ श्री.पी. बी. औताडे यांच्या तर्फे नाकारला.**

**श्रवणोत्तर स्वीकृती....**

Digitally signed by VIJAYA NARAYANRAO KATKAR
Date: 2026.01.14 15:12:37 +0530

**(व्ही.एन.काटकर)**

**प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी,**

**दिनांक–१४.०१.२०२६** **न्यायालय क्र.४, श्रीरामपूर.**